# लोक महाविद्यालय, वर्धा

## समाजशास्त्र विभाग

## <u>अहवाल सत्र 2014 -15</u>

सन 2014-15 या शैक्षणिक सत्रामध्ये लोक महाविद्यालय वर्धा येथील समाजशास्त्र विभागांतर्गत समाजशास्त्र अभ्यास मंडळाची स्थापना करण्यात आली. समाजात निर्माण होत असणा-या विविध समस्यांचे विद्यार्थ्यांना आकलन व मार्गदर्शन व्हावे हया हेतूने महाविद्यालयामध्ये 'सामाजिक समस्या व दुर्बल वंचित घटक' या विषयावर व्याख्यान आयोजीत करण्यात आले. व्याख्यानाकरीता वर्धा येथील उषःकाल बहुउद्देशिय शिक्षण संस्थेच्या अध्यक्षा मा. सौ. उषाताई फाले यांना आमंत्रित करण्यात आले.

महाविद्यालयामध्ये आयोजीत व्याख्यान कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी महाविद्यालयाच्या प्राचार्या डॉ.तायडे मॅडम उपस्थित होत्या. तसेच 'सामाजिक समस्या व दुर्बल वंचित घटक' या विषयावर प्रमुख वक्त्या म्हणून मा.सौ.उषाताई फाले उपस्थित होत्या. कार्यक्रमाचे प्रास्ताविक प्रा.सौ.अर्चना येऊलकर यांनी केले. त्या प्रास्ताविकात त्यांनी व्याख्यान सत्र आयोजीत करण्याचा उद्देश प्रगट केला. प्रा.डेहणे मॅडम यांनी आभार प्रदर्शन करुन कार्यक्रमाची सांगता केली.

समाजशास्त्र विभागातील अभ्यासक्रमाचा भाग म्हणुन समाजशास्त्राच्या पदव्युत्तर विद्यार्थ्यांचे सेमीनार आयोजीत करण्यात आले. त्याकरिता महाविद्यालयाच्या प्राचार्या डॉ. सौ. पुष्पा तायडे मॅडम, प्रा. येऊलकर मॅडम, प्रा. डेहणे मॅडम व प्रा.उमाटे मॅडम यांचे विद्यार्थ्यांना मार्गदर्शन लाभले.

प्रा. अर्चना येऊलकर
समाजशास्त्र विभाग,
लोक महाविद्यालय, वर्धा